# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२० नोव्हेंबर, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# विधिसंघर्ष बालकांकडुन चोरीच्या ०३ दुचाकी जप्त

दिनांक १९/११/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर आणि रामनगर परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, दोन इसम नागपुर रोड वरोरा नाका परिसरात बजाज पल्सर २२० गाडीने संशयीतरित्या फिरत आहे. अशा माहितीवरून स्थागुशा पथकाने सदर दुचाकी चालकास थांबवुन त्यांना विचारपुस केली असता, सदर दोन्ही इसम विधीसंघर्ष बालक असुन त्यांचे ताब्यातील दुचाकी पल्सर ही त्यांनी आठ ते दहा दिवसा अगोदर शहर परिसरातुन चोरी केल्याची कबुली दिल्याने वाहनाचे रेकॉर्ड चेक केले असता, सदर **१)** पल्सर २२० क्र. एमएच ३४ बीजे ०३४० ही आणि **२)** हिरो होंडा स्प्लेंडर क्र. एमएच ३४ एई १३५२ या बाबत चंद्रपुर शहर पोलीस स्टेशन येथे अनुक्रमे ९२१/२०१९ आणि ९२५/२०१९ अन्वये गुन्हा नोंद आहे. तसेच पोलीस स्टेशन रामनगर येथील अप.क्र. १४१२/२०१९ कलम ३७९ मधील दुचाकी **३)** पल्सर २२० क्र. एमएच ३४ एटी ३३०८ ही सुध्दा सदर विधिसंघर्ष बालकांकडुन जप्त करण्यात आली आहे.

सदर विधिसंघर्षग्रस्त बालकाकडुन पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर आणि रामनगर येथे एकुण तिन गुन्हे उघडकीस आले असुन एकुण १,०५,०००/—रू चा मुदद्‍माल जप्त करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही श्री. महेश्वर रेडड्‍ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोनि. श्री. ओ.जी.कोकाटे यांचे नेतृत्वात पोउपनि. विकास मुंढे, पोहवा. महेंद्र भुजाडे, पोना. अविनाश दशमवार, पोशि. जावेद सिदद्‍ीकी, कुंदन बावरी यांनी पार पाडली.

———————————————————————————————

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)


## स्थानिक गुन्हे शाखेची दारू तस्करांविरूध्द कार्यवाही

### ०४ आरोपीसह ३१ लक्ष ९८ हजाराचा मुदद्‌माल जप्त

दिनांक २०/११/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम नेहरू नगर चंद्रपुर कडे एका आयशर ट्रक वाहनाने विक्री करीता दारूची वाहतुक करीत असुन त्या ट्रक समोर पायलेटींग करीता एक इंडीगो वाहन चालत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरून स्थागुशा पथकाने तात्काळ नेहरू नगर येथील उद्यानासमोर नाकेबंदी लावली. नाकेबंदी दरम्यान मिळालेल्या माहितीप्रमाणे एक इंडीगो कार आणि आयशर ट्रक येतांना दिसले. सदर वाहनास थांबवुन वाहनातील इसमांना विचारपुस करून झडती घेतली असता, वाहनामध्ये प्लास्टीकच्या पिश्व्यामध्ये मोठया प्रमाणात दारूचा साठा मिळुन आला.

सदर वाहनात देशी दारूच्या ११८ प्लास्टीक पिश्व्यामध्ये १०० नग प्रमाणे **११,८०,०००/—रू** चा माल, आणि दारूची वाहतुकीकरीता वापरलेले वाहन आयशर ट्रक वाहन क्र. एमएच १८ एए ९७७८ **किं. १५,००,०००/—रू,** एक इंडीगो सिएस वाहन क्र. एमएच ३१ सीए ३८०७ **किं. ५,००,०००/—रू,** आणि ०६ मोबाईल फोन **किं. १८,०००/—रू** असा **एकुण ३१,९८,०००/—रू** चा मुदद्‌माल जप्त करण्यात आला आहे. सदरच्या गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे १)सत्यजित उर्फ भुषण प्रकाश वाघ वय २६, २) रविंद्र भगवान कोळी वय १९ दोन्ही रा. बाळापुर फांगणे ता. जि. चंद्रपुर, ३) अजय सुभाष राउत वय ४२ रा. डायमंड नगर नागपुर, ४) जावेद अब्बास वोरा वय ४५ रा. फुले कॉलनी कला मंदीर जवळ धुळे यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेडड्री यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोहवा. राजेंद्र खनके, पोना. गजानन नागरे, जमीर पठाण, अमजद खान, मिलींद चव्हाण, अनुप डांगे, पोशि. जावेद सिदद्दीकी यांनी पार पाडली.

———————————————————————————————